पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**प्रेसनोट क्र. ७७ दिनांक २३/१०/२०२३**

# डायल ११२ आपत्कालीन प्रतिसाद प्रणालीवर फोन करुन खोटी माहिती दिल्याने वाडा पोलीस ठाणे यांचेकडून गुन्हा दाखल.

राज्यातील नागरिकांना आपात्कालीन परिस्थितीत पोलीस सेवा एकाच टोल फ्रि क्रमांकावर उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने, महाराष्ट्र राज्यात डायल-११२ प्रकल्प कार्यान्वीत करण्यात आलेला आहे. त्या अंतर्गत पालघर जिल्हयातील सर्व पोलीस ठाणेस दुचाकी व चारचाकी वाहने पुरविण्यात आलेली असुन त्या वाहनावर एम.डी.टी व इतर यंत्रणा बसविण्यात आलेली आहे. डायल ११२ वरुन आलेल्या तक्रारीस तात्काळ मदत मिळण्यात यावी यासाठी २४ तास पोलीस अंमलदार हे कर्तव्यासाठी नेमलेले आहेत.

दि.२१/१०/२०२३ रोजी १४:३५ वाजता डायल ११२ वर कॉल आला की, वाडा पोलीस ठाणे हद्दितील ब्ल्यु स्टार कंपनी, वसुरी खुर्द शिळेपाडा येथे यातील कॉलर संजय गणपत सुर्वे यांनी माहिती दिली की, "कॉलरच्या डोक्याला संदीप नामक व्यक्तीने गोळी मारली आहे व कॉलरला जीवे मारण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी तात्काळ पोलीस मदत हवी आहे" असा कॉल मिळाला. सदर कॉल मिळताच वाडा पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक श्री. सुरेश कदम हे तात्काळ सोबत ४ पोलीस अधिकारी व १५ अंमलदारासह घटनास्थळी पोहचले. घटनास्थळी पोहोचले असता डायल ११२ वर वरील कॉल करणारे कॉलर संजय गणपत सुर्वे वय ४७ वर्षे रा. वसुरी खुर्द, सुर्वेपाडा ता. वाडा जि.पालघर याची भेट घेतली असता व घटनास्थळी असलेले वसुरी खुर्द गावातील साक्षीदार यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी गोळीबाराची घटना घडलेली नसल्याचे सांगितले. यावरुन सदर कॉलरने लोकसेवकाला खोटी माहीती देऊन पोलीसांची दिशाभुल केल्याचे दिसून आले. त्यामुळे डायल ११२ वर खोटा कॉल करुन पोलीसांची दिशाभूल करणारा आरोपीत इसम याचेविरुध्द वाडा पोलीस ठाणे पो.नॉ.कॉ.रजि.नं. २६/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ५१०,१८२,१७७ प्रमाणे दि.२१/१०/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

**तरी जिल्ह्यातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते कि, डायल ११२ हा क्रमांक नागरिकांना आपात्कालीन परिस्थितीत पोलीस सेवा तात्काळ मिळावी यासाठी हा टोल फ्री क्रमांक कार्यान्वीत केलेला आहे. त्यामुळे कोणीही पोलीसांची दिशाभुल होण्याच्या उद्देशाने डायल ११२ वर कॉल करु नये. अन्यथा असे दिशाभुल कॉल करणाऱ्यांवर वरीलप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येईल.**